आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१ सप्टेंबर २०२४ -रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवरायांचा पुतळा पडल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीचं मुंबईत आंदोलन/ विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकल्याची मुख्यमंत्र्यांची टीका

- पोलीस पाटलांच्या थकित मानधनाचा प्रश्न मार्गी लावण्याचा शासननिर्णय उद्या निर्गमित करणार असल्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

- राष्ट्रीय पोषण सप्ताहाला आजपासून देशभरात सुरुवात

**आणि**

- सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन ध्वज आणि बोधचिन्हाचं अनावरण राष्ट्रपतींच्या हस्ते आज होणार

**<><><><><><>**

मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीनं आज मुंबईत आंदोलन केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, खासदार अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, अनिल देशमुख, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, पृथ्विराज चव्हाण, आमदार भाई जगताप, छत्रपती शाहू महाराज यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेते आणि कार्यकर्त्यांनी हुतात्मा चौकात जमून सरकारचा निषेध केला. तिथून मोर्चा काढून गेटवे ऑफ इंडियापर्यंत गेले आणि तिथल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ त्यांनी आंदोलन केलं. मालवणला पुतळा उभारण्यात झालेल्या भ्रष्टाचारामुळे तो पुतळा पडला, त्याचा अपमान झाला,

म्हणून हे आंदोलन करत असल्याची भूमिका शरद पवार यांनी मांडली. मालवणला घडलेल्या प्रकारामुळे महाराष्ट्राचा धर्म आणि महाराष्ट्राचा अभिमान यांचा अपमान केंद्र आणि राज्य सरकारने केल्याची टीका नाना पटोले यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणाबद्दल मागितलेली माफी मग्रूरीने मागितलेली असून ती आम्हाला मान्य नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. मोठा बंदोबस्त या परिसरात तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, नांदेडमध्ये विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं.

**<><><><><><>**

विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून त्यांना पराभव दिसत आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे परिस्थिती बदलली असल्याचा दावा त्यांनी केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीचं आंदोलन पूर्णपणे राजकीय असल्याची टीका छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलताना केली. दरम्यान, महाविकास आघाडीच्या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून भाजपानेही आज राज्यात ठिकठिकाणी आंदोलन केलं.

**<><><><><><>**

राज्यातल्या पोलीस पाटलांच्या गेल्या ४ महिन्यांच्या थकीत मानधनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उद्या शासननिर्णय निर्गमित करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. पोलीस पाटील संघाच्या ८ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात ते आज नागपूर इथं बोलत होते. पोलीस पाटलांच्या सेवानिवृत्तीचं वय ६५ वर्षं करण्याच्या मागणीबाबत राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असंही ते म्हणाले. पोलीस पाटील हे गावचे गृहमंत्री असतात, कायदा सुव्यवस्थेसह या संरचनेत आता महिलासुरक्षा हे महत्वाचं कर्तव्य आहे. त्यासाठी

पोलीस पाटलांनी अधिकाराबरोबरच कर्तव्याच्या जाणीवेतून कार्य करावं, असं आवाहन त्यांनी केलं. राज्य शासनानं या पदाला मान आणि मानधन मिळावं म्हणून वाढीव १५ हजार रुपये मानधन दिलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

हिंगोली जिल्ह्यात आजपासून जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. राज्यात विविध मुद्यांवरून सुरू असलेली आंदोलनं, राजकीय सभा यांच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं हिंगोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. जमावबंदीचे आदेश १२ सप्टेंबरपर्यंत लागू राहणार आहेत.

<><><><><><>

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या मात्र शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या धनगर समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी “पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना” राबवायला राज्यशासनानं मान्यता दिली आहे. याअंतर्गत क प्रवर्गातल्या धनगर समाजातल्या विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीयकृत बँक खात्यामध्ये भोजन, निवास तसंच इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी ३८ हजार ते ६० हजार पर्यंतची रक्कम थेट वितरित करण्यात येईल. इयत्ता बारावीत किमान ६० टक्के गुण असणारे धनगर समाजातले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असतील.

<><><><><><>

राष्ट्रीय पोषण सप्ताह आजपासून देशभरात सुरू होत आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या अन्न आणि पोषण मंडळातर्फे सन १९८२पासून दरवर्षी १ ते ७ सप्टेंबरदरम्यान हा सप्ताह आयोजित केला जातो. पोषण आणि आरोग्याबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणं हा या सप्ताहाचा उद्देश आहे. तसंच विविध वयोगटांच्या पोषणाच्या गरजांबाबतची माहिती नागरिकांना देणं,

सरकार आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत पोषणाबद्दल शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून राबवले जाणारे उपक्रम अधोरेखित करणं यावरही या सप्ताहादरम्यान भर दिला जातो. या कालावधीत अनेक चर्चासत्रं, कार्यशाळा, शैक्षणिक उपक्रम, परिषदा, जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन ध्वजाचं आणि बोधचिन्हाचं अनावरण करणार आहेत. तसंच जिल्हा न्यायपालिकेच्या समारोप सत्राला देखील त्या संबोधित करणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आयोजित केलेल्या दोन दिवसीय परिषदेत जिल्हा न्यायव्यवस्था, पायाभूत सुविधा, सर्वसमावेशक न्यायालय कक्ष, न्यायिक सुरक्षा, प्रकरण व्यवस्थापन आणि प्रशिक्षण या पाच सत्रांचा समावेश होता. या परिषदेचं उद्घाटन काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. महिलांवरचे अत्याचार आणि मुलांची सुरक्षा ही समाजासाठी चिंतेची बाब असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज देशातल्या ५० युवा नादस्वरम कलाकारांना शिष्यवृत्तीचे धनादेश प्रदान करण्यात आले. मुंबईत झालेल्या 'नादस्वर उत्सव' या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते युवा आणि होतकरू नादस्वरम वादकांना प्रत्येकी १ लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी राज्यपालांच्या हस्ते प्रसिद्ध नादस्वर वादक शेषमपट्टी शिवलिंगम यांना श्री षण्मुखानंद नादस्वरम चक्रवर्ती संगीत कला विभूषण जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

इलेक्ट्रॉनिक स्वरवाद्यांच्या वाढत्या प्रसारामुळे नादस्वरम हे ध्वनी वाद्य हळुहळू विलुप्त होत आहे. या कलेचं जतन करण्याच्या हेतूनं दरवर्षी ५० नादस्वर कलाकारांना चक्रवर्ती टी एन राजा रथिनम पिल्लई फेलोशिप देण्यात येते.

**<><><><><>**

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत ३९ रुपयांची वाढ झाली आहे. इंडियन ऑईलच्या संकेतस्थळावर ही माहिती देण्यात आली. याआधी गेल्या महिन्यात ८ रुपये ५० पैशांनी एलपीजी गॅसच्या किंमती वाढवण्यात आल्या होत्या, तर जुलैमध्ये गॅस सिलिंडरचे दर ३० रुपयांनी कमी झाले होते.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या जबलपूर इथून हैदराबादला जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्स या कंपनीच्या विमानात बॉम्ब असल्याच्या अफवेमुळे ते नागपूर विमानतळावर उतरवण्यात आलं. यावेळी विमानात ६२ प्रवासी होते. विमानाची सुरक्षा तपासणी केल्यानंतर कोणतीही संशयास्पद वस्तू न आढळल्याने ते हैदराबादला रवाना झालं.

**<><><><><>**

वाशिम इथं मंगरूळपिर मार्गावर साखर फाट्याजवळ काल ट्रक आणि दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला. वाशिम ग्रामीण पोलीस या अपघाताचा तपास करत आहे.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिकचा आज चौथा दिवस आहे. उत्तम कामगिरी करून आज पदकतालिकेत भर घालण्याचा भारताचा प्रयत्न असेल. पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत रवी रंगोली, तर उंच उडी स्पर्धेत निषाद कुमार आज मैदानात उतरतील. १० मीटर रायफल प्रोन प्रकाराच्या पात्रता फेरीत अवनी लेखराही खेळणार आहे. बॅडमिंटनमध्ये भारताचे सुहास यथिराज आणि सुकांत कदम अंतिम फेरी गाठण्यासाठी एकमेकांविरुद्ध खेळतील. त्यांच्यापैकी कुणीही जिंकलं, तरी भारतासाठी एक पदक निश्चित झालं आहे. दरम्यान, काल रुबिना फ्रान्सिस हिनं महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात कास्यपदक पटकावून भारताची पदकसंख्या पाचवर नेली.

**<><><><><>**

राज्यात गेल्या चोवीस तासांपासून संततधार पाऊस सुरू आहे. **नांदेडमध्ये** काल रात्रीपासून जोरदार पाऊस पडला. यामुळे जिल्ह्यातले विष्णुपुरी आणि मानार हे दोन्ही प्रकल्प पूर्ण भरले आहेत. जिल्ह्यात गेल्या चोवीस तासांत ५६ पूर्णांक १० शतांश मिलीमीटर पावसाची नोंद झाली. किनवट तालुक्यात नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**सोलापूर** जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असल्यानं खरीप पिकांना धोका निर्माण झाला आहे. जोरदार पावसामुळे जिल्ह्यातल्या अनेक भागातल्या शाळा, महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यातही काल रात्री मेघगर्जनेसह मुसळधार पावसाने हजेरी लावली. पुढल्या चोवीस तासांत जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**//<><><><><>//**